MHSO110010182023

**नियमित दिवाणी दावा क्र. ४६३/२०२३**

धनराज मोरे विरुध्द आनंदराव मोरे

**निशाणी क्र. ४८ वरील आदेश**

सदरचा अर्ज वादी ने प्रतिवादी क्र. ०४ अरुणा तुळशिराम मोरे यांचे वारस रेकॉर्डवर घेवून त्याकामी दुरुस्ती होवून मिळणबाबत सदरहु अर्ज केलेला आहे.

०२. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा निरंतर ताकीदीसाठी केला आहे. प्रतिवादी क्र. ०४ अरुणा तुळशिराम मोरे या दिनांक २७.०९.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना प्रतिवादी क्र १ आनंदराव याने तसे प्रतिज्ञापत्र करुन गावचे हक्क पत्रामध्ये प्रतिवादी क्र ४ हिच्या म्त्युनंतर नोंद लावून घेतल्याचे वादीस समजले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र ४ अरुणा हिचा वारस प्रतिवादी क्र १ आनंदराव आहेत व ते दाव्यात समाविष्ठ आहेत. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र ०४ अरुणा तुळशिराम मोरे यांन्या नावास कंस करुन त्याचे खाली मयत वरस प्रतिवादी क्र १ आनंदराव तुळशिराम मोरे अशी दुरुस्ती होवून मिळणबाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास विरोध करत योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

०४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. अर्जाचे स्वरुप पाहता वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.४ च्या वारसांना दाव्याकामी सामील करण्यासाठी व दुरुस्ती करणेकामी दिलेला आहे. सदयस्थितीत त्याचा कोणताही तोटा प्रतिवादींना संभवत नाही. किंबहुना प्रतिवादी क्र.४ चे वारस दाव्याकामी घेणे व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती

करणे हे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक बाब आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे

**आदेश**

१. सदरहु अर्ज निशाणी क्र. ४४ हा निशाणी क्र. ४६ वरील आदेशाची पुर्तता करण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादीने रक्कम रूपये २००/- (अक्षरी रूपये दोनशे मात्र) आज किंवा पुढील तारेखपर्यंत प्रतिवादीस देण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्जात उल्लेखीत केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. ०४ अरुणा तुळशिराम मोरे यांचे वारस दाव्यामध्ये दुरूस्ती करून सामील करावेत तसेच दुरूस्त दाव्याची प्रत या आदेशापासुन १४ दिवसांचे प्रतिवादी यांस पुरवावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2026.01.01 17:34:12 +0530

(एम.जे.गायकवाड)
४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
माळशिरस

दिनांक ०१.०१.२०२६

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 01 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 01 / 2026. |